राज्यातील सर्व खाजगी शासन अनुदानित आयुर्वेदिक व युनानी महाविद्यालय व रुग्णालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन (पेन्शन) व मृत्यू-नि-सेवानिवृत्ती उपदान (ग्रॅच्युईटी) लागू करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एडीआर-२०१६/प्र.क्र.४१/१६/आयु-२**

गो.ते.रुग्णालय आवार, ९ वा मजला,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
तारीख: ०५ जानेवारी, २०२२.

**वाचा:-**

**शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र. एडीआर-२०१६/ प्र.क्र.४१/आयु-२, दि.१०.०८.२०१६.**

**प्रस्तावना:-**

उपरोक्त वाचा येथील शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व खाजगी शासन अनुदानित आयुर्वेद व युनानी संस्थांतील कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन व उपदान लागू करण्यात आले आहे. उक्त शासन निर्णयासोबतच्या प्रपत्र-अ मधील क्र.XVII खालीलप्रमाणे आहे :-

“एखादा कर्मचारी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त न होता, स्वेच्छा सेवानिवृत्तीने व इतर कारणामुळे सेवानिवृत्त झाला असेल तर त्याबाबत निवृत्तीवेतन अदा करण्याबाबत शासन स्तरावरुन स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.”

उक्त तरतूदीमध्ये स्वेच्छा सेवा निवृत्ती व इतर कारणांमुळे सेवा निवृत्त झाल्यास निवृत्ती वेतन अदा करण्याबाबत स्पष्टता नव्हती.

२. श्री. शरद नागनाथ बुबणे व इतर यांनी स्वेच्छा सेवानिवृत्ती/राजीनामा/रुग्णता सेवानिवृत्तीनंतर सेवानिवृत्ती वेतन मिळणेसंदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र.४५९७/२०१८ दाखल केली आहे. श्री.शरद बुबणे व इतर यांनी दाखल केलेल्या न्यायालयीन याचिकेच्या अनुषंगाने दिनांक.१८.३.२०२१रोजी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत:-

“5. We have perused the Government Resolution dated 10 August, 2016 and the annexures thereto. Clause XVII of the Annexure to the Government Resolution indicated that the decision as to whether the employee has expired or has taken voluntary retirement would be entitled to the pensionary benefits would be taken separately. The reply affidavit does not disclose that such a separate uniform decision has been taken and what is pointed out is only a decision taken in the Petitioner’s case. If the State has not taken any uniform decision not to grant such benefit by issuing necessary amendment or a Government Resolution then, prima facie, ground taken in reply that the Government Resolution dated 10

August, 2016 concludes the issue against the Petitioner, does not appear to be correct.

6. Learned AGP for the *Respondent* seeks time. The State to make its stand clear on the above aspect of the matter by filling an additional affidavit or producing on record the Government Resolution or Circular covering the above aspect."

यानुसार शासन निर्णय, दिनांक १०.०८.२०१६ सोबतच्या प्रपत्र-अ मधील क्र. XVII बाबत सुस्पष्ट आदेश निर्गमित करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

## शासन निर्णय :-

राज्यातील खाजगी शासन अनुदानित आयुर्वेद व युनानी संस्थेतील कर्मचारी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त न होता, स्वेच्छा सेवानिवृत्तीने व इतर कारणामुळे सेवानिवृत्त झाला असेल अशा कर्मचाऱ्यांना सेवा निवृत्तीवेतन व उपदान अनुज्ञेय राहणार नाही.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१३९/२१/सेवा-४, दि.४.१.२०२२ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. तसेच सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२०१०३१८२१२३२७१३ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ASHVINI ARVIND MOON

Digitally signed by ASHVINI ARVIND MOON
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=256f9c04db2775105e35722d86c7abf921f1e2b3ce0814ddf12f61298e6b8df8, serialNumber=5b80e03b84ee853744d97398ce98dea1b571f29e3698196de1076d43e3407b3b, cn=ASHVINI ARVIND MOON
Date: 2022.01.05 17:25:18 +05'30'

(अश्विनी मुन)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई.
४. कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
५. महालेखापाल-महाराष्ट्र १/२, (लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर.
६. महालेखापाल-महाराष्ट्र १/२, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
७. वित्त विभाग, वित्तिय सुधारणा-१/व्यय-१३/सेवा-४, मंत्रालय, मुंबई.

८. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. संचालक, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. सहाय्यक संचालक आयुर्वेद, मुंबई/पुणे/नागपूर. (आयुष संचालनालयामार्फत)
११. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१२. जिल्हा कोषागार अधिकारी.
१३. सर्व खाजगी शासन अनुदानित आयुर्वेद व युनानी संस्था (आयुष संचालनालयामार्फत)
१४. निवडनस्ती (आयु-२)